<u>नियमित दिवाणी मुकदमा नं.१९४/२०१५ निशाणी ८१ लगत आदेश</u>

(बंडु रामचंद्र गव्हाणे वि. भिमराव रामचंद्र गव्हाणे व इतर)

**<u>CNR No. MHSO20-000785-2015</u>**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ३७ व ३८ यांचेतर्फे विनंती अर्ज की, प्रतिवादी क्र. ४२ यांनी सदर दाव्याचे कामी प्रतिदावा दाखल केला आहे. परंतु, सदर प्रतिदाव्याची नक्कल त्यांना दि. १९/०६/२०१७ रोजी मिळाली आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ३७ व ३८ यांनी सादर करीत असलेली कैफीयत कायदा मुदतीत आहे. सदर प्रतिदाव्यास कैफीयत नाही असा हुकूमही झालेला नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. ३७ व ३८ यांनी त्यांची कैफीयत स्विकारली जावी अशी विनंती केली आहे.

२. सदरच्या अर्जावर प्रतिवादी क्र. ४२ तर्फे अर्जावरच म्हणणे दिले आहे की, प्रतिवादी क्र. ३७ व ३८ यांचा प्रस्तुतचा अर्ज बेकायदेशीर असुन प्रतिदाव्यातील वादीस मान्य व कबुल नाही. सदर दाव्यात दि.०६/११/२०१५ रोजी प्रतिदावा दाखल केलेला आहे. त्यानुसार दि. ०१/०८/२०१७ रोजी ते कैफीयत देत असल्याने सुमारे दोन वर्षांचा विलंब झालेला आहे. तसेच त्यांनी विलंब माफीचा व विना कैफीयत आदेश रद्द दाखल केलेला नसल्याने सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. सदरच्या अर्जावर दोन्हीं वकिलांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ३७ व ३८ यांनी प्रतिदाव्याच्या नकला उशिला मिळाल्याने त्यांची कैफीयत मुदतीत असल्याचे कथन केले आहे. प्रतिवादी क्र. ३७ व ३८ यांना सदर प्रतिदाव्यास मुदतीत कैफीयत

दाखल करण्यास विलंब झालेला आहे. प्रस्तुतचा दावा प्रतिदाव्यातील वादींनी प्रतिवादींविरुध्द वाटप होऊन कब्जा मिळणेसाठी मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रतिदाव्यातील मागणी पाहता वादाचा विषय गुणदोषांवर निर्गत होणे आवश्यक आहे. परंतु, विलंब माफ केल्याशिवाय प्रतिवादी क्र. ३७ व ३८ यांना त्यांची कैफीयत दाखल करणे शक्य नाही. तसेच विलंबाचा कालावधी लक्षात घेता खर्च प्रतिवादीवर ठेवणे योग्य आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो -

<u>आदेश</u>

१. अर्ज (नि.८१) प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ३७ व ३८ यांनी दाव्यातील प्रतिवादी क्र.४२ यांना खर्चाची रक्कम ४००/- पुढील तारखेपर्यंत देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.३७ व ३८ यांना कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

SEEMA KETAN DESHMUKH
Digitally signed by SEEMA KETAN DESHMUKH
Date: 2022.07.22 14:48:55 +0530

सांगोला.
दिनांक – २०/०७/२०२२

( सौ. एस. के. देशमुख )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
सांगोला.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S. P. Parekar |
| (b) | Court | : | Mrs. S. K. Deshmukh,<br>Civil Judge, J.D.& J.M.F.C.,Sangola |
| (c) | Judgement /Order signed by P.O. on | : | 21/07/2022 |
| (d) | Judgement /Order uploaded on | : | 21/07/2022 |